
# अंगणवाडी केंद्रावर आयोजित सामाजिक कार्यक्रमांचे योजना तसेच नियोजन

## विषय MN2

Module NO - 11







# मातांच्या आनंदासाठी आमच्याकडे कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते ?

कार्ड दाखवा आणि सर्वांना सांगा, आज आपण अंगणवाडी केंद्रात आयोजित केलेला सामुहिक कार्यक्रम ठेवला आहे तसेच त्याचे योग्य नियोजन यावर चर्चा करणार आहोत.

सभेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करा. त्यांना विचारा कि दर महिन्यात त्यांना माता तसेच कुटुंबीयांना भेटणे तसेच त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी कोणकोणते कार्यक्रम असतात.

डाव्या बाजुला दिलेल्या माहितीचा उपयोग करा व चर्चेला पुढे सुरुवात करा.

कार्यकर्त्यांना सांगा की, आजच्या चर्चे विषयी त्यांना अगोदरच कल्पना आहे, ते असं बरेचसे कार्यक्रम आणि समाज तसेच अंगणवाडी केंद्रात सहभाग तसेच आयोजित केलेले आहे.

हल्ली अंगणवाडी केंद्र दरदिवशी चालू असतात. परंतु माता आणि कुटुंबातील एक-एकाला तसेच समुहाला सल्ले देण्याची संधी खुपच कमी मिळते.

**ह्यामध्ये काही संधीही आहेत :**

महिन्यात ठरविलेल्या घरांची भेट योजना.

पूरक सात्विक आहार वितरण दिवस (टी.एच.आर.)

लसिकरण आणि वी.एच.एस.एन.डी. दिवस

अन्नग्रहण दिवस / ओटि भरण इत्यादी

महिला वर्गाची सभा इत्यादी


संघ अथवा एक-एक करून सल्ला देण्याची ह्या सर्व संध्या पहिल्या पासून ठरविलेल्या आहेत. आज आपण ठरवून आयोजित केलेल्या कार्यक्रमात खास करून अन्नदान दिवस यावर चर्चा करणार आहोत.



# मातांच्या आनंदासाठी आमच्याकडे कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते ?



- गृहभेट
- टी.एच.आर. आणि लसीकरण दिवस
- अंगणवाडीमध्ये कार्यक्रमांचे आयोजन, जसे कि अन्नग्रहण दिवस / ओटि भरण इत्यादी
- महिला वर्गाची सभा





# सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन का?

कार्ड दाखवा.

कार्यकर्त्यांना विचारा कि ते दर महिन्याला सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन का करतात व त्याचे महत्व काय आहे?

कार्यकर्त्यांना आपल्या अनुभवाबद्दल विचारा.

डावीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे चर्चा पुढे चालू ठेवा.

- समाजात होणाऱ्या रिती-परंपराचे, जसे कि ओटि भरण, अन्नग्रहणाच्या माध्यमातून गर्भवती महिला आणि बाळ यांच्या देखभाली संबंधी माहिती द्या.
- हया कार्यक्रमांच्या माध्यमातून फक्त गर्भवती महिलांनाच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना विशेषत: त्यांचे पती व सासू हयांना गर्भवती महिला व त्यांचे बाळ हयांच्या आरोग्या विषयी माहिती द्या.
- अशा प्रकारच्या वातावरणाची निर्मीती करा, जेथे समाजातील सर्व सदस्य व इतर कार्यकर्ते मिळून निर्णय घेतील कि ते गर्भवती माता आणि बालक यांची देखरेखीबद्दल दिलेल्या माहितीची अंमलबजावणी करतील.
- गावतील सदस्यांनाही याबद्दल जागरुक करा.



# सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन का ?



- रुढी- परंपरा तसेच इतर सणांच्या माध्यमातून आहारा व आरोग्य याविषयी माहिती समाजापर्यंत पोहचवा.

- गर्भवती मातांच्या घरातील खासकरुन तर पती व सासू ह्यांना आहार व आरोग्य यांचे महत्व समजवा.

- सामाजिक आणि कौटुंबिक निर्णयांवर भर द्या कि, आपण दिलेल्या माहितीस ते अंमलात आणतील.





# सामाजिक कार्यक्रम - अन्नग्रहण दिवसाची तयारी

आज आपण अंगणवाडी केंद्रात आयोजित केलेल्या सामुदायिक कार्यक्रमाबद्दल चर्चा करुया. (उदा. अन्नग्रहण दिवस)

कार्यकर्त्यांना सर्व बिंदूचे एक-एक करुन वाचन करावयास सांगा व सर्वांना चर्चा करायला सांगा.

डावीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे चर्चेला पुढे सुरुवात करा.

आज आपण चर्चा करणार आहोत की, अन्नग्रहन दिवस कसा साजरा करणार आहोत.

**अन्नग्रहण दिवस ठरविण्याआधी आपल्याला काय-काय तयारी करायला हवी.**

- सहा महिने पूर्ण झालेल्या बालकांची यादी तयार करा.
- कुटूंबाला अन्नग्रहण दिवसाची तारीख व दिनांक याविषयी आधीपासून कल्पना दया. आई-वडिल या व्यतिरिक्त घरातील इतर वरिष्ठ लोकांनाही आमंत्रित करा.
- अन्नग्रहण दिवसाच्या वेळी ठरविलेल्या बालकांना अन्न देण्याकरिता वाटी आणि फळे (केळी अथवा पपई) यांची खरेदी करा.
- सर्व आलेल्या मातांचे, पती तसेच सासूबाई हयांना कार्यक्रमात सहभागी होण्यास उत्तेजित करा.
- मातांना तसेच घरातील इतर सदस्यांना घरी बनविलेले अन्न जसे कि, वरण-भात, तूप/तेल, अंडि अथवा भाज्या एका वाटित घेऊन येण्यास सांगा.
- बालकांना आशिर्वाद देण्याकरिता गावातील वृद्ध, इतर माता, ग्रामसेवक सदस्य तसेच पंचायत समिती मधील सभासदांना आमंत्रित करावे.

याचप्रकारे आपण अंगणवाडी केंद्रात होणाऱ्या इतर कार्यक्रमांची तयारी केली पाहिजे, फक्त कार्यक्रमाचे विषय लक्षात घेवून त्याप्रमाणे कुटुंबाला आमंत्रण व माहिती वेगवेगळी असणार.



# सामाजिक कार्यक्रम - अन्नग्रहण दिवसाची तयारी



- सहा महिने पूर्ण झालेल्या बालकांची यादी बनवा.

- अन्नग्रहण दिवसाची तारिख ठरवा व सर्व कुटूंबियांना त्याची कल्पना द्या.

- पती आणि सासू हयांना विषेश आमंत्रित करा.

- ठरविलेल्या बालकांसाठी वाटी व फळे (जसे कि केळी व पपई) खरेदि करुन आणावे.





# ह्या कार्यक्रमाचे आयोजन कसे कराल.

कार्ड दाखवा.

सहकाऱ्यांना सर्व चित्रांचे वर्णन करण्यास सांगा.

सर्व कार्यकर्त्यांना ह्या चर्चेत भाग घेण्यास उत्तेजित करा.

डावीकडे दिलेल्या माहितीचा उपयोग करुन चर्चेला चांगले स्वरूप दया.

**अन्नग्रहण सोहळा / दिवसाच्या वेळी काय करायचे आहे.**

- अंगणवाडी केंद्रात साफ-सफाई ठेवा, एका बादलीत पाणी ठेवा, हात धुण्यास साबण तसेच कार्यक्रमाच्या वेळी लागणाऱ्या सर्व वस्तु तयार ठेवा (भांडी)
- कुटूंबातील सदस्यांना बसण्यासाठी डावीकडे चटई अंथरा.
- बाळाला वरच्या आहारासंबंधी काही अन्नपदार्थ जसे कि, घरी बनविलेले वरण-भात, भाजी, केळी, पपई, अंडि इत्यादी एका ताटात मांडून ठेवा.
- वरिल आहारासंबंधी बनविलेले बॅनर, तक्ते व इत्यादी साहित्य काढूण ठेवणे.
- अन्नग्रहणकरण्या अगोदर मातांना आपण विनंती करा कि त्यांनी जेवणाची भांडी व आपले हात पाण्याने स्वच्छ करावेत.
- आता आपण मातांना विनंती करा कि त्या वरण-भात अथवा दूध-भात व्यवस्थित मऊ करुन घ्या
- मातांना सांगा कि आत तुम्ही मऊ केलेला आहार बाळाला थोडया-थोडया प्रमाणात भरविण्यास सुरुवात करा.
- माता सोबत पिता तसेच कुटूंबातील इतर सदस्यांनाही बाळाला भरविण्याच्या प्रक्रियेत सहभागी करुन घ्या.
- कुटूंबातील सदस्यांना बाळाला वरचा आहार सुरू करताना त्याचे योग्य ते प्रमाण व दिवसातून किती वेळा भरविणार ह्या विषयी योग्य मार्गदर्शन करा.



# ह्या कार्यक्रमाचे आयोजन कसे कराल.














# अन्नग्रहणाच्या दिवशी कोणता मुख्य संदेश दयाल ?

कार्ड दाखवा.

सर्व कार्यकर्त्यांना विचारा कि ते अन्नग्रहनाच्या दिवशी कोणता मुख्य सल्ला देतात.

सर्व कार्यकर्त्यांना ह्या चर्चेत सहभागी करण्यासाठी उत्तेजित करा.

डावीकडे दिलेल्या माहितीचा उपयोग करुन चर्चेला योग्य स्वरूप दया.

चर्चा झाल्यानंतर आपण सर्वांना सांगा कि आता आपण महिलांचे गट पाडून त्यांच्यासोबत चर्चा व मार्गदर्शन करण्याच्या कार्यक्रमाचा एक छोटाचा रोल प्ले करूया.

काही अंगणवाडीतील कार्यकर्त्यांना सहा महिन्यांच्या बाळाचे आई-वडिलांची भूमिका करण्यासाठी निवडूया कोणा एकाला गटामध्ये बसविणे, डाव्याबाजूला दिलेल्या माहितीचे योग्य मार्गदर्शन देण्यास सांगा. रोल प्ले झाल्यानंतर सर्वांना सोबत मिळून रोल प्ले चे सारांश विचारा.

- सहा महिन्यांनंतर मातेच्या दूधाव्यतिरिक्त वरचा आहाराची सुरूवात करणे जरूरी आहे, सहा ते आठ महिन्यापर्यंत दिवसातून २ ते ३ वाटया २ ते ३ वेळा भरविणे आणि जस जसे बाळ वरचा आहार घेण्यास सुरूवात करेल तेव्हा त्याच्या आहारात विविधता आणा.
- सहा महिन्यापर्यंत स्तनपानातून बाळाच्या विकासाचे संपूर्ण पोषक तत्वे मिळतात. परंतु सहा महिन्यानंतर बाळाला व्यवस्थित वाढीसाठी वरच्या आहाराची आवश्यकता असते.
- बाळाला वेगवेगळ्या प्रकारचे मऊ असे जेवण भरवा.
- बाळाला जेवण बनविताना तसेच भरवताना स्वच्छतेची काळजी घ्या.
- वरच्या आहारासोबतच स्तनपान ही चालू ठेवा.
- बाळाची व्यवस्थित रित्या वाढ होत आहे का, हे पाहण्यासाठी त्याचे दरमहा वजन करा.



# अन्नग्रहणाच्या दिवशी कोणता मुख्य संदेश दयाल ?



- बाळाला योग्य वाढीसाठी वरचा आहार देणे आवश्यक आहे.
- सहा ते आठ महिन्याच्या बाळाला २-३ वाट्या वरचा आहार दिवसातून २-३ वेळा भरवावा.
- जेवानात विभिन्न प्रकारचे मऊ जेवण बाळाला भरवा.
- वरच्या आहारा सोबतच स्तनपानही सुरू ठेवावा.
- बाळाचे वजन नियमितपणे प्रत्येकी महिन्याला करावे.














# अन्नग्रहण दिवसानंतर काय कराल ?

कार्ड दाखवा.

प्रतियोगितांना सर्व बिंदूचे वाचन तसेच उत्तर देण्यास सांगावे.

सर्व कार्यकर्त्यांना ह्या चर्चेत भाग घेण्यास उत्तेजित करावे.

डावीकडे दिलेल्या माहितीच्या मदतीने चर्चेला योग्य स्वरुप द्या.

**अनुकरण तसेच मदत करणे ?**

- बाळ तसेच माता यांना जेवण तसेच ते भरविण्याची सवय पडे पर्यंत नेहमी-नेहमी गृहभेट देणे तसेच वरचा आहार भरविण्याविषयी योग्य मार्गदर्शन करणे.
- कुटूंबातील सदस्यांना सांगा की बाळाला भरविताना संयम ठेवा. तसेच बाळाला जेवण्यास उत्तेजित करा.
- कुटूंबातील सदस्यांना सांगा कि जर त्यांना वाटत असेल तर त्यांनी लगेच आम्हाला कळवावे.

मागील मॉडयूलचे मार्गदर्शक बिदूंचा वापर करा.




# अन्नग्रहण दिवसानंतर काय कराल ?



- अन्नग्रहण दिवसाच्या पहिल्याच आठवडयात गृहभेट दया व खात्री करून घ्या कि बाळाला वरचा आहार दिला जात आहे का.

- बाळ तसेच माता यांना जेवण तसेच ते भरविण्याची सवय पडे पर्यंत नेहमी-नेहमी गृहभेट देणे तसेच वरचा आहार भरविण्याविषयी योग्य मार्गदर्शन करणे.









# कामाचे नियोजन

कार्ड दाखवा.

प्रतियोगितांना सांगा कि आज आपण सभा संपविण्या अगोदर आजचा सारांश जाणून घेवू.

कार्यकर्त्यांना डाव्या बाजूकडिल बिंदूंचे वाचन करायला सांगा.

प्रत्येक बिंदूवर सर्वांची सहमती असेल तेव्हाच पुढे जा.

याची खात्री करणार आहोत कि प्रत्येक बाळासोबत आपण ह्याच क्रमाणे काम करणार आहोत.

सांगा कि (महिला पर्यवेक्षिका) पुढील काही महिन्यांपर्यंत प्रत्येक कार्यकर्त्यांसोबत काम करुन पडताळणी करणार आहे आणि हयावर लक्ष ठेवणार आहे कि कार्यकर्त्यांनी आज सांगितलेल्या प्रक्रियेप्रमाणे कामे केली आहेत किंवा नाही.

- दर महिन्यात सहा महिने पूर्ण झालेल्या बाळाचा पत्ता आपण गृहभेट रजिस्टर मध्ये नोंदवणार आहोत.
- प्रत्येक महिन्यात वरच्या आहारास सुरुवात करण्यासाठी अन्नग्रहण उत्सव / दिवस यासाठी एक दिवस ठरविणार आहोत.
- प्रत्येक कुटूंबाला आम्ही तोपर्यंत गृहभेट देणार आहोत जोपर्यंत बाळ व माता हयांना वरचा आहार खाण्यास व भरविण्याची सवय होत नाही.



# कामाचे नियोजन



- दर महिन्यात सहा महिने पूर्ण झालेल्या बाळाचा पत्ता आपण गृहभेट रजिस्टर मध्ये नोंदवणार आहोत.

- प्रत्येक महिन्यात वरच्या आहारास सुरुवात करण्यासाठी अन्नग्रहण उत्सव / दिवस यासाठी एक दिवस ठरविणार आहोत.

- प्रत्येक कुटूंबाला आम्ही तोपर्यंत गृहभेट देणार आहोत जोपर्यंत बाळ व माता हयांना वरचा आहार खाण्यास व भरविण्याची सवय होत नाही.





# सामाजिक कार्यक्रमाची चेकलिस्ट, रिपोर्ट नमूना आणि मार्गदर्शन मुद्दे यावर चर्चा

चेकलिस्ट ची प्रत देवून कार्यकर्त्यांना त्याच्या वापराविषयी सांगा.

रिपोर्टिंग नमून्याची कॉपी देवून कार्यकर्त्यांना त्याला भरण्याचे मार्गदर्शन करा.

मार्गदर्शन मुद्दयांची प्रत देवून कार्यकर्त्यांना त्याचे महत्व समजवा.



# सामाजिक कार्यक्रमाची चेकलिस्ट, रिपोर्ट नमूना आणि मार्गदर्शन मुद्दे यावर चर्चा



- चेकलिस्टवर चर्चा करू.
- रिपोर्टिंग नमून्यावर चर्चा करू.
- मार्गदर्शन मुद्दयांवर चर्चा करू.

